PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Haldi Kunku
Year: 1979

Song: Gauri Mandi Gavar Bai Mangalagavar
Lyricist: Jagdish Khebudkar

गवरी मंदी गवर बाई मंगळागवर
चला गं मंगळागौरीचा या करूया जागर

आयांनो या गं बायांनो
शेजारणीनो या गं या
फुलून आलयं अंगण
बाई झिम्यानं धरलयं रिंगण
चल गं माझ्या मैतरणी
माहेरवाशीन घडनी
कशानं मन हे झाल गं
बाई कावरं बावरं

सासुरवाशी सून रूसून बसली कैशी
यादवराया राणी रूसून बसली कैशी

सासू गेली समजावयाला
चल चल सूनबाई माझ्या घराला
अर्धा संसार देते तुजला
असला संसार नकोच मजला
नको हूं...

नणंद गेली समजावयाला
चल गं वहिनी तुझ्या घराला
समजून सांगीन मी दादाला
असली समजूत नको मजला
नको हूं...

रूसवा फुगवा कर तीचा बाई नोकर चाकर
हं चला गं मंगळागौरीचा या करूया जागर

खुर्ची का मिरची
मिरची का खुर्ची
खुर्ची का मिरची
खुर्ची का मिरची मिरची गं
जाशील कैशी तू
असा खेळ खेळता खेळत
हरशील कैशी तू
ओटी अंबेची अंबेची
भरशील कैशी तू
वाण पदरात पदरात
घेशील कैशी तू
सांभाळ बाई कुंकू गं
घाल मायेची पाखर

का गं का गं का गं
दिल वचन मोडतेस का गं
वसा घेतलेला टाकतेस का गं
तोंडी पतीच्या लागतेस का गं

भरताऱ्याचा स्वभाव जसा भोळा की शंकर

फुगडी फू बाई लुगडी धू
मी न्हाई तू बाई मी न्हाई तू
असं हूं...

निसर फुगडी घोडा फुगडी
फुगडीचा धिंगाणा
फुगडीचा धिंगाणा
गं बाई पिंग्याचा पिंगाणा

Literacy for a Billion

पोरी पिंगा गं पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा

तुझ्या पिंग्यानं मला बोलावलं
दिस घालावल पोरी पिंगा
पोरी पिंगा ग पोरी पिंगा गं

लेक लाडकी होती सासरी
आली माहेरी पोरी पिंगा
गोड सासर गोड माहेर
जोड संसारी पोरी पिंगा
सासर माहेर म्हणती गं
जशी दुधात साखर

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*